महाराष्ट्र शासन

# पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय


फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक :०२२-२२६२३३८०/२२६२३४४६ Email Id : asthapna.doam@gmail.com


## संचालनालयातील आस्थापना व सेवाविषयक कामकाज करार पध्दतीने करण्यासाठी राज्य शासकीय सेवेतील गट-ब अधिका-याची नामिका सूची (पॅनेल) तयार करण्याबाबत

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद) कार्यालयातील **सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करणे, पदभरती, बिंदुनामावली अद्ययावत करणे व सेवाविषयक तसेच आवश्यकतेनुसार अन्य दैनंदिन आस्थापनाविषयक बाबी हाताळणे** इत्यादीसाठी सदर कामकाजाचा मंत्रालय किंवा राज्य शासकीय कार्यालयातील गट-ब पदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असलेल्या व शासनाच्या मंत्रालयीन सेवेतील कक्ष अधिकारी किंवा शासकीय विभागातील प्रशासकीय अधिकारी गट-ब संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नामिका सूची (Panel) ३ वर्षाच्या कालावधीकरीता पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद्द) या कार्यलयासाठी तयार करावयाची आहे. सदर पॅनेलमधील समाविष्ट अधिका-यांमधून नियुक्त देण्यात आलेल्या अधिका-यांस सदर कामकाजाकरीता मासिक पारिश्रामिक हे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय, दि.१०.०६.२०२५ नुसार सेवानिवृत्तीच्या वेळेस मिळणारे मुळ निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई व अन्य भत्त्यासह मिळणा-या रकमेएवढे राहील.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे. अधिक माहिती व अर्ज महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज करण्याची मुदत दिनांक १०.०७.२०२५ पासून २०.०७.२०२५ पर्यंत आहे.

सही/-
(डॉ.तेजस मदन गर्गे)
संचालक
पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
म.रा, मुंबई

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद्द)

<u>सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत</u>

<u>विभागाची आवश्यकता:</u>

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद) कार्यालयातील सेवाप्रवेश नियम अद्ययावत करणे, रिक्त पदभरती प्रक्रिया राबविणे, बिंदुनामावली अद्ययावत करणे व तत्सम कामासाठी सेवा व आस्थापनाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या, राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतील कक्ष अधिकारी किंवा इतर शासकीय विभागातील प्रशासकीय अधिकारी गट-ब संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची नामिकासूची तयार करावयाची आहे व त्यामध्ये समाविष्ट सेवा निवृत्त अधिका-यांचा प्रथम १ पद वर्षाच्या कालावधीकरीता, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद्द) या विभागात करार पध्दतीने नियुक्ती द्यावची आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती प्रथम केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार राज्य शासनाच्या मंत्रालयीन किंवा अन्य विभागातील सेवेतून कक्ष अधिकारी/प्रशासकीय अधिकारी गट-ब या संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३) सेवाप्रवेश नियम अद्ययावत करणे, बिंदुनामावली अद्ययावत करणे, रिक्त पदभरती प्रक्रीया राबविणे तसेच आवश्यकतेनुसार सेवा व आस्थापनाविषयक कामे करणे आवश्यक असल्याने या संबंधित कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा,

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्याऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज करण्याची मुदत दिनांक १०.०७.२०२५ पासून २०.०७.२०२५ पर्यंत "संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१" या पत्त्यावर पोहोचेल, अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२६२३३८० या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जाना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार संचालनालयाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

अर्जाचा नमुना

<u>सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज</u>

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :-.................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :- .................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- .................................................................

४) सेवानिवृत्तीच्या वेळचे कार्यालय :- .................................................................

५) भ्रमणध्वनी क्रमांक :- .................................................................

६) जन्म दिनांक/वय :- .................................................................

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय :- होय/नाही

८) अनुभव :-

| अ.क्र. | यापूर्वी काम केलेल्या विभागाचे नाव | कालावधी | कामाचे स्वरूप/विषय |
|---|---|---|---|
| | | | |

९) विशेष उल्लेखनीय काम :- .................................................................

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (मुख्य कार्यालय) येथील सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करणे, रिक्त पदभरती, सुधारीत बिंदूनामावली अद्ययावत करणे, सेवाविषयक तसेच इतर आवश्यकतेनुसार आस्थापनाविषयक बाबींचे कामकाज यासाठी, एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी